# श्रीरामचरित्र

**कै. चिंतामण विनायक वैद्य**

एम.ए., एल. एल. बी.

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**श्रीरामचरित्र : कै. चिंतामण विनायक वैद्य**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
सौ. वृषालीराज बडकस

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये २७०/-

# प्रस्तावना

जसा महाभारत हा ग्रंथ आपणा भारतवासीयांस प्रिय व पूज्य आहे तसाच रामायण हाही ग्रंथ आपणांस प्रिय व पूज्य आहे. महाभारताच्या कथेची ओळख मराठी वाचकांस थोडक्यांत सोप्या व रम्य भाषेत, सुंदर व प्रसंगांच्या चित्रांनी चित्रशाळेंत छापलेल्या 'भारतीय युद्ध' या पुस्तकाने करून दिली आहे. त्याचप्रमाणे रामायणाच्या कथेचीही ओळख मराठी वाचकांस व्हावी हे अत्यंत इष्ट आहे. सारांश 'भारतीय युद्ध' ग्रंथास जोडीदार असा रामायणावर मराठी ग्रंथ असावा असे वाटल्यावर चित्रशाळेचे मॅनेजर यांच्या सूचनेने मी हे श्रीरामचरित्र तयार केले आहे. यात प्रथम उपोद्घातांत रामायण ग्रंथाची व रामकथेची थोरवी थोडक्यात सांगून पुढे वाल्मीकींनी रामायणात वर्णिलेली रामकथा दिली आहे. गोष्ट व वर्णने मूळ ग्रंथांत जशी आहेत तशीच दिली असून एक दोन ठिकाणांखेरीज करून बाकीच्या सर्व कल्पना आद्य कवींच्याच आहेत. किंबहुना जागजागी मूळ ग्रंथांतीलच संस्कृत शब्द वापरले आहेत. तात्पर्य, ग्रंथ वाचताना परिचितांस आपण मूळ रामायणच वाचतो आहोत असे वाटेल व अपरिचितांस महाकवीच्या उदात्त कवित्वाची ओळख होईल. ग्रंथाची भाषा होताहोईतो रसाळ व सुगम ठेवली आहे. शेवटी एक लहानसा उपसंहार जोडून त्यात रामकालीन स्थिती व रामचरित्राचे रहस्य यांचे लहानसे शब्दचित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकात सर्व विषय असे घेतले आहेत की, ते आबालवृद्ध स्त्री-पुरुषांस मनोरंजक व बोधप्रद व्हावे. सारांश सर्व तऱ्हेने हे पुस्तक सर्व दर्जाच्या व वयांच्या मराठी वाचकांस गोड व उपयोगी वाटावे असा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न कितपत सिद्धीस गेला आहे, हे ठरविणे सुज्ञ व रसिक वाचकांवर सोपवितो.

ऑगस्ट, १९११ **चिंतामण विनायक वैद्य**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| उपोद्घात | ... | ७ |
| बालकांड | ... | ११ |
| अयोध्याकांड | ... | ३५ |
| अरण्यकांड | ... | ९२ |
| किष्किंधाकांड | ... | ११९ |
| सुंदरकांड | ... | १४७ |
| युद्ध-कांड | ... | १७६ |
| उत्तरकांड | ... | २२६ |
| उपसंहार | ... | २६१ |

# श्रीराम–चरित्र

## उपोद्घात

श्रीमद्वाल्मिकी–रामायण हा आपल्या भारतीय आर्यांच्या वाङ्मयातील एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. याची थोरवी जितकी वर्णन करावी तितकी थोडीच आहे. या ग्रंथास 'कोहिनूर' हिऱ्याची उपमा दिली असता साजेल. आर्यांच्या बुद्धिमत्तेच्या खाणीतून निघालेले हे एक अमूल्य रत्न आहे. याचे किरण आर्यभूमीवर सर्वत्र पसरले असून, ते सर्वांस नीतीचा उज्ज्वल मार्ग दाखवीत आहेत. रामायणासारखा सर्वतोपरी उदात्त ग्रंथ कोणत्याही देशांत व कोणत्याही भाषेत नाही, असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही. काव्याची अंगे दोन, एक कवी व दुसरे काव्यांत वर्णिलेला नायक. या दोन्ही अंगांनी रामायणाची बरोबरी करणारा जगांत दुसरा ग्रंथच नाही. रामचंद्रासारखा अलौकिक सामर्थ्याचा व उदात्त नीतिमत्तेचा पुरुष इतिहासात झाला नाही व वाल्मीकीसारखा प्रतिभासंपन्न व उच्च कल्पनांचा कवीही आजपर्यंत झाला नाही. ग्रीस व रोम या पाश्चात्त्य प्राचीन देशांत होमर व व्हर्जिल नावाचे प्रख्यात कवी झाले व त्यांची इलियड व इनीयड अशी दोन काव्ये पाश्चात्त्य देशांत उत्कृष्ट मानली जातात. इंग्लंड देशातील मिल्टन कवीचे 'पॅराडाईज लॉस्ट' नावाचे काव्यही उत्तमांत गणिले जाते; परंतु या काव्याहून रामायण कितीतरी श्रेष्ठ आहे! कदाचित कोणी होमर वगैरे कवींची वाल्मीकीशी तुलना करू शकेल; पण त्यांच्या काव्यांतील नायक आकिलीस् इनियस् अथवा ॲडम हे नीतिमत्तेच्या दृष्टीने रामचंद्रापुढे अगदी क्षुद्रासारखे भासतात. सारांश, रामायणासंबंधाने हिंदुस्थानच्या आर्यास जो अभिमान वाटतो तो योग्य आहे. वाल्मीकी कवीने रचिलेले रामायण भरतखंडातील आर्यास प्रिय होऊन गेले आहे

व आज हजारो वर्षांपासून हिंदुस्थानातील आर्य लोक रामाचे गुण गाऊन परमेश्वराच्या चरणी लीन होत आले आहेत. हजारो वर्षांपासून हिंदुस्थानातील आर्यस्त्रियांच्या अंतःकरणात सीतेचे पवित्र चरित्र भरून राहिले आहे. तिचे पतीवरील निःसीम प्रेम, तिचे अढळ पातिव्रत्य, पतीवर आलेली सर्व संकटे त्याजबरोबर भोगण्याची तिची तयारी इत्यादी अनेक गुणांचे चित्र आमच्या स्त्रियांच्या हृदयांवर उमटले असल्याकारणाने आज हजारो वर्षांपासून हिंदू स्त्रीया आपल्या समाजास भूषण झाल्या आहेत. सारांश, रामाचे व सीतेचे नाव माहीत नाही असा अभागी मनुष्य हिंदुस्थानांत आर्यांत तरी– आजवर नव्हता, हल्ली नाही व पुढेही नसणार. अर्थात श्रीरामचरित्राची थोडीबहुत तरी माहिती प्रत्येक हिंदू विद्यार्थ्यास असावी, हे अधिक विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही.

रामाचे उदात्त व मनोहर चरित्र म्हणजे संसारात मनुष्याने नीतीने कसे वागावे, हे दाखविणारा एक निष्कलंक आरसाच होय. रामचंद्रांचे नाव घेतल्याबरोबर आपल्यासमोर सर्व सद्गुणांची एक मोहक मूर्ती उभी राहते. उत्तम पुत्र, उत्तम पती, उत्तम बंधू, उत्तम मित्र, उत्तम शत्रू, उत्तम राजा यांचे उत्कृष्ट उदाहरण एकाच ठिकाणी पाहणे असेल तर रामचंद्रांचे पाहावे. वाल्मीकी ऋषींनी एकदा नारद मुनींस 'सर्वात उत्तम राजा सांप्रत कोण आहे?' असा प्रश्न केला. तेव्हा नारद मुनींनी रामचंद्रांचेच नाव सांगितले. नारदांनी त्याप्रसंगी रामचंद्रांचे जे वर्णन केले ते फारच मनोहर आहे. 'इक्ष्वाकु कुलातील रामचंद्राने आपणा स्वतःस जिंकले असून आपल्या पराक्रमाने आपल्या शत्रूसही जिंकिले आहे. तो नीतिमान, बुद्धिमान, धर्मज्ञ व सत्यप्रतिज्ञ आहे; त्याचे मन फार मोठे आहे; तो सज्जनांना उदार आश्रय देणारा असून सर्वांवर त्याची समदृष्टी आहे; तो समुद्रासारखा गंभीर आहे; हिमालयासारख्या धैर्याने निष्कंप आहे; अग्नीसारखा क्रोधाने तीव्र आहे; पृथ्वीसारखा क्षमाशील आहे, कुबेरासारखा उदार आहे व धर्मासारखा सत्यवादी आहे.' सर्व सद्गुणांचे माहेरघर असा राजा रामचंद्र प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार होता, असे आपण मानतो, याचे इंगित हेच आहे. सर्व गुण एका मनुष्यांत असणे, हे परमेश्वराच्या अंशाशिवाय संभवत नाही. ज्या ज्या विभूतींच्या ठिकाणी तेज आणि नीती ही एकत्र दृष्टीस पडतात, त्यांच्या ठिकाणी ईश्वरी अंश आहे असा आपल्या आर्यांचा सिद्धांत आहे. शिवाजीमहाराजांना जरी एवढे मोठे ऐश्वर्य प्राप्त झाले होते, तरी त्यांच्या अंगच्या लोकोत्तर सद्गुणांत यत्किंचितही न्यूनता आली नाही. त्यांची मातापितरांच्या ठिकाणची अलौकिक

भक्ती, त्यांचा परस्त्रीच्या ठिकाणचा मातेसमान भाव, त्यांचे आपल्या लोकांविषयीचे विलक्षण प्रेम व औदार्य या गोष्टी पाहून लोक त्यास शंकराचा अवतार समजत, यात आश्चर्य कोणते? मग सर्वच दृष्टीने अत्यंत उदात्त असा नीतीचा धडा घालून देणार रामचंद्र विष्णूचे अवतार आहेत, असे आपण मानतो, यात वावगे काय आहे? रामचंद्रांच्या चरित्रात दिसून येणाऱ्या अलौकिक नीतिमत्तेबद्दल सर्व मतांच्या मनुष्यास आदर वाटलाच पाहिजे. भारतीय आर्यांस तर रामाचे चरित्र यामुळे अत्यंत प्रियकर वाटणे साहजिक आहे.

अशा या उदात्त चरित्राला वाल्मीकीच्या लोकोत्तर काव्याने अजरामर करून ठेविले आहे. वाल्मीकींनी रामायण कसे रचिले, याबद्दलची मनोरंजक हकीगत वाचकांस माहीत असणे अवश्य आहे. वर सांगितल्याप्रमाणे नारद मुनींनी रामाचे वर्णन करून त्यांचे चरित्र वाल्मिकीऋषींस थोडक्यात सांगितले. वाल्मिकीस रामाचे चरित्र ठाऊक नव्हते असे नाही. रामचंद्रांची प्रिय पत्नी सीता ही त्यांच्या आश्रमांत होती; परंतु मोठ्या मनुष्याने आपल्या अधिकारयुक्त वाणीने एखादी गोष्ट सांगितली, म्हणजे ती आपल्या हृदयांत भरून जाते, त्याप्रमाणे वाल्मिकींच्या हृदयात रामाचे चरित्र नारदांनी वर्णन केल्यानंतर विशेष रीतीने भरून गेले. त्याच चरित्राचा विचार करीत ते स्नानास बाहेर निघाले. त्यांचा आश्रम अंतर्वेदीत गंगा व तमसा या नद्यांच्या संगमावर होता. त्यांच्या डोक्यात रामाचे उदात्त चरित्र भरून गेले असल्यामुळे, विचाराच्या नादात ते तमसानदीच्या काठाकाठाने जाता जाता एका गहन अरण्यात शिरले. इतक्यांत क्रौंच पक्ष्यांचे एक जोडपे त्यांच्या नजरेस पडले. ते नदीच्या काठी आनंदाने क्रीडा करीत होते. तो एका पारध्याने त्या जोडप्यांपैकी नराला बाण मारला त्याबरोबर तो पक्षी रक्तबंबाळ होऊन खाली पडला व ती मादी आपल्या पतीस ठार मारलेले पाहून मोठा आक्रोश करून ओरडू लागली. हा हृदयद्रावक देखावा पाहून वाल्मिकी ऋषींचे कोमल अंतःकरण कळवळले. ते क्रोधाच्या आवेशात त्या व्याधाकडे पाहून म्हणाले, 'हे निपादा! ज्या अर्थी तू या क्रौंच जोडप्यांपैकी कामाने मोहीत झालेल्या नरपक्ष्यास निर्दयपणाने ठार मारिलेस, त्या अर्थी तुला या जगतात हजारो वर्षे प्रतिष्ठा मिळणार नाही.' 'मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती: सभा:। यत्क्रौंचमिथुनादेकमवधी: काममोहितम्', हे शब्द वाल्मीकींच्या मुखांतून निघाले, ते कविताबद्ध वाणीने निघाले. ज्या वेळेस मनुष्याचे हृदय उचंबळते, त्या वेळेस त्याच्या तोंडातून प्रासादिक लयबद्ध

शब्द निघतात, हे कित्येकांच्या अनुभवास आले असेल. वाल्मिकी ऋषींस तर सरस्वती जन्मतःच अनुकूल होती. तेव्हा वरील प्रसंगी त्यांचा शोक श्लोकबद्ध निघाला यात आश्चर्य कोणते? लौकिक संस्कृतांतील हा चार चरणांचा पहिलाचा लयबद्ध श्लोक होय. या श्लोाकाची सुश्लिष्ट रचना पाहून वाल्मिकींसच मोठे आश्चर्य वाटले. त्यास त्या दुःखांतही आनंद झाला! रामचरित्रावर अशा सुंदर श्लोकांचे एक काव्य रचावे असा त्यांच्या मनांत एकदम विचार आला. ही कल्पना त्यांच्या मनात येत आहे तो स्वत: ब्रह्मदेव तेथे प्रकट होऊन त्यांनी वाल्मिकींचा 'आदिकवी' या पदवीने गौरव केला व तुम्हास माझ्या प्रसादाने रामाचे सर्व चरित्र– मग ते प्रत्यक्ष असो अगर गुप्त असो गत असो अगर भावी असो प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणे ज्ञात होईल, असा त्यांनी त्यास वर दिला. ब्रह्मदेवाच्या प्रसादाने याप्रमाणे रामाचे सर्व चरित्र वाल्मीकींस हातातील वस्तूप्रमाणे प्रत्यक्ष झाल्यावर त्यांनी आपल्या रसाळ वाणीने व अलौकिक प्रतिभेने रामायण काव्य रचिले. या काव्याची सहा काण्डे आहेत, शिवाय भविष्यासहित उत्तराकाण्ड असून एकंदर श्लोकांची संख्या २४००० होती. याप्रमाणे काव्य रचून तयार झाल्यावर ते प्रथम कोणास शिकवावे याचा ऋषी विचार करू लागले. तो सीतेची सुंदर मुले त्यांच्या दृष्टीस पडली. त्यांची कुशाग्रबुद्धी व मधुर कंठ हे पाहून ही मुले हे काव्य शिकण्यास योग्य आहेत, असे वाटून वाल्मीकींनी लवांकुशांस ते काव्य गाण्यास शिकविले. अगोदरच रामचंद्रांचे उदात्त चरित्र, त्यात आदिकवींची मनोहर कविता व रामचंद्रांचे प्रत्यक्ष पुत्र व सौंदर्याचे पुतळे असे लवांकुश आपल्या मधुर कंठाने गाणारे, असा दुर्लभ योग समजल्यावर मोहकतेची सीमा झालीच पाहिजे. जो जो त्या मुलांचे गाणे ऐके, तो तो तल्लीन व तटस्थ झाल्यावाचून राहत नसे. वाल्मीकी ऋषी एकदा रामचंद्रांचा यज्ञ पाहण्याकरिता त्या मुलास घेऊन अयोध्येस गेले, तेव्हा ते काव्य ऐकण्याकरिता हजारो लोक जमा होऊ लागले. शेवटी त्या मुलांची कीर्ती रामचंद्रांच्याही कानावर गेली. त्यांनी वाल्मीकीस मुलांसह बोलावून आणून सभेत सर्व ऋषींसमोर लवांकुशांस रामायण काव्य गाऊन दाखविण्याची आज्ञा केली. वीणा व मृदंग अशा साहित्यानिशी त्या सुंदर मुलांनी आपल्या कोमल व मधुर कंठांनी ते काव्य गाण्यास आरंभ केला, तेव्हा रामचंद्रांची व सर्व सभाजनांची चित्तवृत्ती तल्लीन होऊन ती सभा चित्रासारखी तटस्थ झाली. (बालकांड, सर्ग १–४). ती कथा येणेप्रमाणे :–

# बालकांड

आर्यावर्तात कोसल नावाचा एक विस्तीर्ण व सुपीक देश असून त्यातून शरयू नावाची मोठी नदी वहात आहे. या नदीच्या काठी त्या देशाची राजधानी अयोध्या वसली होती. हे शहर खुद्द मनूने वसविले होते. या शहरामधून मोठमोठाले रुंद राजरस्ते ठेविले होते, त्या रस्त्यांवर रोज सुवासिक पाणी टाकले जाऊन ठिकठिकाणी फुलांचे मोठमोठे उपहार मांडिले जात. प्राचीन काळी चव्हाट्यांवर फुलांचे हार व गुच्छ ठेवण्याची चाल असे. त्यामुळे रस्त्यांस शोभा येत असे. इतकेच नव्हे तर शहरांत नेहमी सुवास भरून जाई. अयोध्येत ठिकठिकाणी मोठमोठे बाजार असून ते सर्व प्रकारच्या जिनसांनी भरलेले असत. नगरांतील बहुतेक वाडे सातमजली उंच असून त्यांनी अयोध्येस फारच शोभा आली होती. शहराभोवती उंच व मजबूत कोट होता व शहराच्या दरवाजांवरून व कोटावरील ठिकठिकाणच्या बुरुजांवरून युद्धसामुग्री नेहमी जय्यत ठेवलेली असे. कोटाबाहेर पाण्याने भरलेला खोल खंदक असून प्रत्येक दरवाजापाशी खंदकावरून जाण्यायेण्याकरिता काढताघालता येणारे पूल केले होते. नगराबाहेर विस्तीर्ण व रमणीय अनेक बाग असून रोज सायंकाळी शहरांतील स्त्री-पुरुष या बागांत फिरावयास जात. अशा वेळी विंध्यपर्वतांतून व हिमालयांतून आणलेले शेकडो उंच व शृंगारलेले हत्ती इकडून तिकडे फिरताना दिसत. तसेच सिंध, कांबोज, बल्क इत्यादी देशांतून आणलेले हजारो सुंदर घोडेही पाहावयास मिळत. त्या घोड्यांवरून व हत्तींवरून जाणारे वीरही इतर ठिकाणी दिसण्यासारखे नव्हते. शत्रू गैरसावध असता त्यावर ते कधीही बाण टाकीत नसत व त्यांचा टाकलेला बाण कधी फुकटही जात नसे. ते आपल्या नुसत्या बाहूंनी वाघासारखे भयंकर बलाढ्य प्राणी मारू शकत. अशा

शूर क्षत्रियांनी, त्याचप्रमाणे विद्वान ब्राह्मणांनी व श्रीमान व्यापाऱ्यांनी भरलेल्या या राजधानीत इक्ष्वाकु वंशांतील दशरथ राजा राज्य करीत होता. तो मोठा न्यायी व दूरदर्शी असून लोकांस अत्यंत प्रिय होता. तो अत्यंत धर्मशील व पराक्रमी असून त्याने अनेक राजे जिंकले होते. तो सर्व पृथ्वींत विख्यात असून शेकडो राजे त्याच्याशी सख्य करण्याची इच्छा करीत होते. दशरथ राजाच्या पदरी हुषार, इमानी व दक्ष असे अष्टप्रधान होते. दशरथ राजाची प्रजा संतुष्ट व सुखी असून समजूतदार, शुद्धवर्तनाची व एकमताची होती. त्याच्या राज्यांत चोर, दुष्ट अथवा जारकर्म करणारा अगर खोटे बोलणारा एकही मनुष्य नव्हता! सारांश, दशरथाच्या राज्यांत, कोसल देशांत सर्वप्रकारचे सुख नांदत होते. (बालकांड, सर्ग ५-७)

दशरथास सर्व गोष्टी अनुकूल होत्या; पण एका गोष्टीसंबंधाने मोठे न्यून होते. त्याच्या तीन पतिव्रता राण्यांच्या पोटी त्यास एकही पुत्रसंतान नव्हते. यामुळे त्यास वारंवार दुःख होई. शेवटी राजास विचार सुचला की, अश्वमेध व पुत्रकामेष्टी हे यज्ञ केल्यास कदाचित ईश्वराच्या कृपेने आपल्यास पुत्र होईल. राजाने आपला विचार वसिष्ठ गुरूंस व सुमंत वगैरे प्रधानांस सांगितला. तेव्हा सर्वांनी राजाच्या विचारास आनंदाने अनुमोदन दिले. लागलीच अश्वमेधाची तयारी सुरू झाली. शरयूच्या तीरावर एक विस्तीर्ण यज्ञमण्ड उभारला गेला व यज्ञाकरिता हजारो खंड्या अन्नसामुग्री जमविण्यात आली. नंतर दशरथाने आपल्या तिन्ही राण्यांस यज्ञाची दीक्षा घेण्यास सांगितले, तेव्हा त्यास अतिशय आनंद झाला. पुत्र नसल्यामुळे त्यांची मुखे चिंतेने नेहमी कोमेजलेली दिसत; परंतु ही आज्ञा ऐकताच हिवाळा गेल्यानंतर जशी कमळे प्रफुल्लीत होतात तशी त्यांची मुखे प्रसन्न दिसू लागली. वसिष्ठांनी दशरथास त्याच्या राण्यांसह यज्ञदीक्षा देऊन यज्ञाचा घोडा सोडला. तो पुष्कळ देश फिरून परत आल्यावर ऋत्विजांनी त्यास यथाविधी मारून त्याचे अग्नीत हवन केले. अश्वमेध संपूर्ण झाल्यावर ऋष्यशृंग ऋषींनी दशरथाकरिता पुत्रकामेष्टी नामक यज्ञ करण्यास प्रारंभ केला. (बाल. सर्ग ११-१४).

ऋष्यशृंगास पुत्रकामेष्टीकरिता मुद्दाम आणविले होते. ऋष्यशृंग हा दशरथाचा जावई होता. ऋष्यशृंगाची हकीगत फारच मनोवेधक आहे. ऋष्यशृंग हा विभांडक ऋषींचा मुलगा असून तो लहानपणापासून बापाच्या देखरेखीखाली वाढला होता. विभांडक ऋषी क्षणभरही विसंबत नसत व त्यास ते स्वतः शिकवीत. याप्रमाणे वाढतावाढता ऋष्यशृंग एक अत्यंत तेजस्वीव विद्वान